# पहिले प्रकरण

## उपोद्घात

पहिले प्रकरण

# उपोद्घात

## १.१. प्रास्ताविक :

'महाभारत' हे आपले राष्ट्रीय काव्य आहे. व्यास- लिखित 'महाभारता'मध्ये गुंतागुंतीची कथानके आणि सामर्थ्यशाली व्यक्तिरेखा ह्यांची वैशिष्ट्यपूर्ण गुंफण आहे. म्हणूनच गेली कितीतरी वर्षे भारतीय जनमानसावर 'महाभारता'चा प्रभाव कायमच राहिला आहे. श्रीकृष्ण, भीष्म, धृतराष्ट्र, भीम, अर्जुन, विदुर, द्रोणाचार्य, पंडू, कर्ण,दुर्योधन, शंतनू यांच्यासारखी अफाट व्यक्तिमत्वाची पुरुषपात्रे जशी 'महाभारता' मध्ये आहेत; तशीच कुंती, गांधारी, द्रौपदी,माद्री, सुभद्रा, यशोदा, देवकी, अशी बलिष्ठ स्त्री पात्रेही 'महाभारता'त आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान टिकवून आहेत. इंद्रप्रस्थ, मथुरा आणि द्वारका ही तीन राज्य निर्माण करूनही राजा न झालेला, पण राजांना निर्माण करणारा श्रीकृष्ण हा भारतीय जनमानसावर राज्य करीत आला आहे. पराक्रमी, रसिक, मुत्सद्दी, चतुर, कलासक्त, दुष्ट-संहारक, सृष्टपालक असा कृषी संस्कृतीमधील श्रीकृष्ण हे भारतीय जनमनाचे आकर्षण आहे.

१९६० नंतर भारतीय सांस्कृतिक वातावरणात साहित्यातून उपेक्षितांचे अंतरंग व्यक्त होऊ लागले. समाजातील तळागाळातील माणसे साहित्याचा विषय बनू लागली. ह्याच भूमिकेतून 'महाभारता'तील उपेक्षित कर्णाकडे मराठी साहित्यिकांचे लक्ष वेधले गेले. शिवाजी सावंत ह्यांनी 'मृत्युंजय' ही प्रदीर्घ कादंबरी लिहिली. गो.नी. दांडेकरांनी 'कर्णायन' लिहिले. रणजित देसाई ह्यांनी 'राधेय' लिहिले. आनंद साधले यांनी 'महापुरूष' लिहिले. दुर्गाबाई भागवत यांनी 'व्यासपर्व'मधून तर इरावतीबाई कर्वे यांनी 'युगांत' मधून कर्णाचे व्यक्तिचित्र रेखाटले. 'कर्ण खरा कोण होता ?' हे दाजी पणशीकरांचे लेखन प्रकाशित झाले. त्याचबरोबर 'टाकलेलं पोर', 'कौंतेय', 'मृत्युंजय' व 'तो राजहंस एक' ही नाटके लिहिली गेली आणि ही सर्वच नाटके रंगभूमीवरदेखील आली. 'महाभारता'तील उपेक्षित कर्ण हाच के.सी.ठाकरे, वि.वा. शिरवाडकर, शिवाजी सावंत आणि मधुसुदन कालेलकर ह्या नाटककारांच्या लेखणीचा विषय झाला. ह्या सर्वच नाटककारांनी कर्णाच्या व्यक्तिमत्वातील विविध पैलूंवर जोर आणि भर देऊन आपापल्या ताकदीने कर्ण उभा केला आहे. ह्या प्रत्येक नाटककाराचा पिंड वेगळा आहे. त्यामुळे ह्या नाटककारांचा कर्ण विभिन्न रंगांनी साकारलेला आहे. नाटककारांना एकाच कर्णाच्या व्यक्तिमत्त्वातील भावलेले हे अनेक रंग कसे असतील, ह्या कुतुहलापोटीच ह्या चार नाटकांचा अभ्यास करण्याचे मी ठरविले.

## १.२. संशोधनविषय निवडण्यामागील भूमिका :

खरे तर प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात नाट्य हे असतेच असते. त्याचाच कलात्मक आविष्कार नाटकात होत असतो. महाराष्ट्राला संत वाङ्मय हे जसे भूषण आहे. तसे नाटक हा देखील मराठी संस्कृतीचा अभिमानास्पद घटक आहे. विष्णुदास अमृत भावे ह्या मराठी नाटकाच्या आद्य विश्वकर्म्याने ८ नोव्हेंबर १८४३ रोजी नाट्यकलेची ज्योत प्रज्वलित केली. ह्याच दिवशी 'सीतास्वयंवर' ह्या नाटकाचा पहिला प्रयोग सादर केला. विष्णुदासांनी जी काही नाटके सादर केली, ती सर्व पौराणिक कथेवर आधारलेली होती. ह्या नाटकांना 'तागडथोम' व 'अलल्लडुर' नाटके असेही संबोधण्यात येत होते. रंजकता आणि अद्‌भुतता ही त्यांच्या नाटकांची प्रधान वैशिष्ट्ये होती. ह्यांनतर १८४९ मध्ये इचलकरंजीकर नाटक मंडळीची स्थापना झाली. ह्या मंडळीचे नाटककार होते पांडुरंग रघुनाथ दातार ऊर्फ बाबाजीशास्त्री. विष्णुदासांचे अतिमानवतेच्या पातळीवरचे नाटक वास्तवाकडे आणण्याचे फार मोठे कार्य दातारांनी केले. नाटकाला इचलकरंजीकरांनी लौकिक प्राप्त करून दिला. नाटकाला विकसनाच्या पुढच्या टप्प्यावर नेण्याचे महत्त्वाचे कार्य मुंबईच्या अमरचंदवाडीकर नाटकमंडळीने केले. अमरचंदवाडीकर नाटक मंडळीने १९ जानेवारी १८५६ ला आपल्या पौराणिक नाटकाच्या जोडीला एक फॉर्स सादर केला आणि अल्पावधीतच हा फार्स लोकप्रिय झाला. त्यानंतरच्या काळात बुकिश नाटकांनी आपला ठसा उमटविण्यास सुरवात केली. वि. ज. कीर्तनेरचित 'थोरला माधवराव पेशवे' हे नाटक इचलकरंजीकर नाटक मंडळाने इ.स. १८६२ मध्ये रंगभूमीवर आणले व मराठी नाटकाला एका वेगळ्या टप्प्यावर आणण्याचे कार्य ह्या बुकिश नाटकांनी केले. रंगभूमीची सजावट व पात्रांचा अभिनय खुलविण्याचे कार्य ह्या बुकिश नाटकांनी केले. बुकीश नाटकांनी कथानकात सुसूत्रता आणली, तसेच नाटकाला मानवी जीवनाच्या अधिक जवळ आणले आणि प्रत्यक्ष जीवनाचा नाट्यमय आविष्कार रंगभूमीवर केला. १८८० पासून किर्लोस्करी संगीत नाटकांना प्रारंभ झाला. ३१ ऑक्टोबर १८८० रोजी 'संगीत शाकुंतल' ह्या नाटकाचा पहिला प्रयोग मोठ्या दिमाखाने झाला. त्यावेळेपासून संगीत नाटकांची परंपरा सुरू झाली. ज्या समाजात नटाचे तोंड बघणे, हे पाप समजले जात होते; त्या समाजात नाटकाला, नटाला आणि नाट्य संगीताला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे महत्त्वाचे कार्य किर्लोस्करांनी केले. त्यानंतर देवल, कोल्हटकर, खाडिलकर व गडकरी ह्या नाटककरांनी मराठी समाजात नाटकाला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. संगीत नाटकामुळे हे युग 'सुवर्णयुग' म्हणून ओळखले जाते. ह्या काळात नाट्यक्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडून आले. परंतु एका बाजूला रंगभूमीला हे वैभव लाभत असतानाच गाण्यांचा अतिरेक, नाटक मंडळीतील कलह, नाटकापेक्षा नटाला दिले

जाणारे महत्त्व, संगीताचा अतिरेक ह्यामुळे नाटकाला अवकळा प्राप्त झाली. ह्या काळात मामा वरेरकर, आचार्य अत्रे, मो.ग. रांगणेकर ह्यांनी नाटकाला सावरण्याचे महत्त्वाचे काम केले. वरेरकरांनी ' प्रबोधनासाठी नाटक' हे तंत्र स्वीकारले. अत्र्यांनी विनोदी नाटकांबरोबरच समस्याप्रधान नाटकेही लिहिली. नाटकाबरोबरच नेपथ्य आणि रंगमंचाचा विचार अत्रे यांनी केला. फिरत्या रंगमंचाचे जनक अत्रे ठरले. या नेपथ्यामुळे रंगसृष्टीमध्ये अनेक प्रयोग नाट्यलेखनापासून संगीतापर्यंत झाले. ह्या साऱ्यामुळे ह्या काळातील बोलपटांचे आक्रमण समर्थपणे थोपविण्याचे कार्य अत्र्यांनी केले. त्यांच्यामुळेच रंगभूमीला पुन्हा चांगले दिवस आले. ह्याच काळात श्री.वि. वर्तक ह्यांनी इब्सेनच्या नाट्यतंत्राचा प्रयोग रंगभूमीवर केला व तो यशस्वीही झाला. त्यामुळे मराठी नाटक अधिक सुटसुटीत व आकर्षक बनले. १९३३ च्या सुमारास रंगभूमीवर अवतरलेल्या अत्र्यांच्या नाटकांनी अफाट लोकप्रियता मिळविली. १९४० नंतर अनेक नाटके रंगभूमीवर आली. ह्या काळात दातार, आयरे, वेलणकर ह्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. ह्याच काळात पु.ल. देशपांडे, मधुसुदन कालेलकर, वि.वा.शिरवाडकर ह्यांचे नाट्येलखन सुरू झाले. १९५० नंतर मराठी नाटकांचा हा प्रवाह विस्तृत होत गेला. नंतरच्या कालखंडामध्ये बाळ कोल्हटकर, मधुकर तोरडमल,विजय तेंडुलकर, श्री.ना.पेंडसे, जयवंत दळवी, वसंत कानेटकर, रणजित देसाई, रत्नाकर मतकरी, अनिल बर्वे, वसंत सबनीस, रमेश पवार, सतीश आळेकर, महेश एलकुंचवार इ. चा समावेश होतो. ह्या नाटककारांनी नाट्य क्षेत्रात विविधता आणून नाटक पूर्वीपेक्षा देखणे केले. नाट्यक्षेत्रात दलित रंगभूमी, बालरंगभूमी,कामगार नाट्य चळवळ, एकांकिका, एकपात्री प्रयोग अशी बरीच प्रगती झाली. राज्यशासनाने राजमान्यता देऊन राज्यनाट्यस्पर्धा सुरू केल्या. वसंत कानेटकरांच्या पौराणिक कथेपासून ते प्रचलित राजकारणापर्यंतच्या सर्व विषयावरील नाटकांना लोकांनी उदंड प्रतिसाद दिला. बाळ कोल्हटकर, मधुसुदन कालेलकर ह्यांनी कौटुंबिक नाटकांचा प्रवाह विकसित केला. १९८०-९० नंतर मानसिक पातळीवरील समस्याप्रधान नाटकांनी जनमानसावर पकड मिळविली. प्रेक्षकाला वैचारिकतेकडे नेणारी ही नाटके समाजाची गरज म्हणून निर्माण झाली. ह्यानंतर पुन्हा विनोदी नाटकांची लाट आली. ह्या काळात लोकनाट्याची परंपरा कायम राहिली. आज नाट्यक्षेत्राने विविध विषय हाताळून बरीच प्रगती केलेली आढळून येते.

मराठी माणसाचे हे नाटकाचे वेड फार पूर्वीपासून आहे. नाटक हे दृश्यकाव्य मानले जाते. त्या दृष्टीने हा एक वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मयप्रकार आहे. मराठी भाषेला पहिल्यापासूच प्रतिभावंत नाटककार व प्रतिभावंत कलावंत लाभत गेले. म्हणून मराठी नाटक हा मराठी संस्कृतीचा झळाळता अलंकार ठरला.

नाटकाचा प्रवाह जसजसा विस्तारत गेला, तसतसे त्यामध्ये बरेच बदल होत गेले. उदा. ऐतिहासिक घटनांवरील, व्यक्तींवरील नाटके ही ऐतिहासिक नाटके, सामाजिक प्रश्नांवरील नाटके ही सामाजिक नाटके, कौटुंबिक नाटके, प्रायोगिक नाटके, दलित नाटके, ह्यामधीलच एक प्रकार म्हणजे पौराणिक नाटक. ह्या प्रकारामध्ये पौराणिक घटना, प्रसंग, किंवा व्यक्ती ह्यांच्यावर आधारीत अशी नाटके लिहिली गेली. 'महाभारता'तील घटनांवर व व्यक्तींवरही बरीच नाटके झाली. त्यापैकीच ' कर्ण' ह्या व्यक्तिरेखेवर आधारलेल्या ' टाकलेलं पोर ' (१९३९) (प्रबोधनकार ठाकरे), ' कौंतेय' (१९५३)(वि.वा.शिरवाडकर), ' तो राजहंस एक' (१९७५)(मधुसुदन कालेलकर), व ' मृत्युंजय' (१९७७)(शिवाजी सावंत) ह्या नाटकांचा मी अभ्यास करण्याचे निश्चित केले.

मला प्रथमपासूनच नाटके वाचण्याची, पाहण्याची आवड आहे. मी हायस्कूलमधील व कॉलेजमधील एकांकिका, पथनाट्य, मूकनाट्य अशा प्रकारांमध्ये भाग घेत होतो. आतापर्यंत मी ज्या भूमिका केल्या, त्या प्रमुख कलाकार म्हणूनच ! 'कथा दिनूच्या मृत्युपत्राची' ह्या एकांकिकेत ' दिनू' ची भूमिका, ' नाटक झालंच पाहिजे' मधील ' विजय'ची भूमिका, तसेच 'सरहद्द' मध्ये एका फौजेतील अधिकाऱ्याची भूमिका अशा प्रमुख भूमिकाच मी साकारल्या. त्यामुळे नाटकाविषयीचे आकर्षण पहिल्यापासूनच माझ्या मनात राहिले आहे. शिवाजी सावंत हे आजच्यातीलच एक नामवंत लेखक. त्यांचे ' मृत्युंजय' (१९७७) हे नाटक वाचनात आल्यानंतर माझ्या मनात त्यातील कर्णाच्या व्यक्तिरेखेची ओढ निर्माण झाली. त्या अनुषंगाने वेगवेगळ्या नाटककारांच्या कर्णाच्या व्यक्तिरेखेवरील नाटकांचा अभ्यास करावा, असे मी ठरविले.

शिवाजी सावंतांनी 'मृत्युंजय' (१९६७) ही कर्णाच्या जीवनावर आधारीत प्रदीर्घ कादंबरी लिहिली. त्या कादंबरीतील महाभारतीय उपेक्षित कर्णाच्या तेजस्वी व्यक्तित्त्वाने मराठी जनमानसास खडबडून जागे केले. म्हणूनच त्यानंतरच्या दशकात कर्णाचे जीवन रेखाटणाऱ्या ' कर्णायन' (गो.नी. दांडेकर), ' राधेय'(रणजित देसाई) ह्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. ह्याच काळात रंगभूमीवरही हा 'कर्ण' अवतरला. 'कौंतेय' हे नाटक १९५३ साली रंगभूमीवर आले. त्यानंतर ' तो राजहंस एक(१९७५) ' मृत्युंजय' (१९७७) ही दोन नाटके जवळपास एकाच काळात मराठी रंगभूमीवर निर्मितीच्या संपन्न थाटात अवतरली.पण ह्याच्या कितीतरी आधी म्हणजेच १९३९ साली कर्णावरील एक सुरेख नाटक मराठी रंगभूमीवर अवतरले होते. ते म्हणजे ' टाकलेलं पोर' ! ' महाभारता'तील ह्या दुर्लक्षित कर्णाने त्यावेळी मराठी जनमानसाची पकड घेतली होती.

ही चारही नाटके रंगभूमीवर आली आणि त्यांनी मराठी रसिक मनावर राज्य केले ते

मात्र वेगवेगळ्या कारणाने ! केशव सीताराम ठाकरे ह्यांचे ' टाकलेलं पोर' (१९३९) हे नाटक एका ' प्रबोधन'काराचे होते. 'कौंतेय' (१९५३) हे नाटक वि.वा.शिरवाडकरांचे म्हणजेच एका कवीचे होते. ' मृत्युंजय' (१९७७) हे नाटक शिवाजी सावंतांचे म्हणजेच एका कादंबरीकाराचे होते, तर 'तो राजहंस एक' (१९७५) हे नाटक मधुसूदन कालेलकरांचे म्हणजे एका नाटककाराचे होते. ह्या दृष्टीने ह्या नाटकांची वाङ्मयीन चिकित्सा करण्याच्या हेतूने व त्यांची बलस्थाने शोधून काढण्याच्या हेतूने मी हा विषय निवडलेला आहे.

## १.३. वापरलेल्या संशोधन पद्धती व अवलंबलेले धोरण :-

' टाकलेलं पोर' (१९३९), ' कौंतेय' (१९५३),' तो राजहंस एक' (१९७५) व 'मृत्युंजय' (१९७७) ह्या चारही नाटकांचा अभ्यास करताना तुलनात्मक संशोधन पद्धतींचा मी अवलंब केलेला आहे.

ह्या चारही नाटकांचे प्रयोगमूल्य वैशिष्ट्यपूर्ण आहे. ते मोलाचेही आहे. पण मला येथे ह्या नाटकांच्या प्रयोगमूल्यांचा अभ्यास अभिप्रेत नाही. नाट्यसंहिता म्हणून ह्या चार नाटकांचे वाङ्मयीन मूल्यमापन करण्याचे मी येथे ठरविले आहे.

## १.४. प्रबंधिकेतील प्रकरणांची मांडणी :-

प्रकरण.१. उपोद्घात

प्रकरण.२. मराठी पौराणिक नाटक : स्वरूप व वाटचाल

प्रकरण.३. के.सी. ठाकरेलिखित 'टाकलेलं पोर' (१९३९) : वाङ्मयीन चिकित्सा

प्रकरण.४. वि.वा. शिरवाडकरलिखित ' कौंतेय' (१९५३): वाङ्मयीन चिकित्सा.

प्रकरण.५. मधुसूदन कालेलकरलिखित'तो राजहंस एक'(१९७५):वाङ्मयीन चिकित्सा.

प्रकरण. ६. शिवाजी सावंतलिखित ' मृत्युंजय' (१९७७) : वाङ्मयीन चिकित्सा.

प्रकरण. ७. उपसंहार : चारही नाटकांचा तुलनात्मक अभ्यास व निष्कर्ष.

संदर्भसूची

■■■■■